महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी, (राज्य उत्पादन शुल्क, विभाग) सोलापूर यांचे कार्यालय,
१४५-अ, रेल्वे लाईन्स, सोलापूर

---

## जाहीर लिलाव

क्रमांक- डिईटी ११२०१८/४४७७ सोलापूर दिनांक /०२/२०१९

१) मे. स्मृती ऑरगॅनिक्स लि., आरएस-२ क्र. ११५/२०१५-१६, एमआयडीसी, चिंचोळी, सोलापूर ही अनुज्ञप्ती शासन समर्पित करण्यात आली असल्याने अनुज्ञप्तीमधील शिल्ल्क १०१५८.१०० ब.लि. ॲबसोल्युट अल्कोहोल मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे मान्यतेनुसार जाहीर लिलावाद्वारे विक्रीसाठी काढण्यात आलेले आहे. सदर १०१५८.१०० ब.लि. ( दहा हजार एकशे अठ्ठावन्न पॉईन्ट शंभर ब.लि.) ॲबसोल्युट अल्कोहोलचा लिलाव दिनांक १५/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात येत आहे.

२) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर कार्यालयाच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र दारुबंदी नियमांतर्गत नोंदविलेल्या गुन्हयातील जप्त मळी मा. न्यायालयाच्या प्राप्त आदेशानुसार लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येत आहे. सदर मळीचा लिलाव दिनांक १५/०३/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर कार्यालयात ठेवण्यात येत आहे.

| अ.क्र. | संबंधित अधिकारी | गु.र.नं. व दिनांक | जप्त मळीचे परिमाण (मे.टन) |
|---|---|---|---|
| १ | निरीक्षक, रा.उ.शु., अ विभाग, सोलापूर | गु.र.नं. १६८/अ/२०१४ दिनांक ०८/०७/२०१४ | १० मे.टन. (अंदाजे) |
| २ | निरीक्षक, रा.उ.शु., ब विभाग, सोलापूर | गु.र.नं. ३५/ब/२०१७ दि. २७/१२/२०१७ | ५.५०० मे.टन (अंदाजे) |

**ॲबसोल्युट अल्कोहोल लिलावाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे आहेत.**

१) उपरोक्त नमूद केलेले ॲबसोल्युट अल्कोहोल औद्योगिक कारणाकरिता विपकृत मद्यार्क वापर करणाऱ्या घटकास अथवा विभागाची विधीग्राहय अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या अनुज्ञप्तीधारक किंवा तत्सम संस्थेस खरेदी करता येईल.

२) **बोलीधारक घटकाने ॲबसोल्युट अल्कोहोल खरेदी केल्यानंतर अनुज्ञप्तीवर मंजूर असलेले डिनेचर्ड वापरुन सदर ॲबसोल्युट अल्कोहोल डिनेचर्ड (विपकृत) केल्यानंतरच वाहतूकीस परवानगी देण्यात येईल. मा. आयुक्तांनी मंजूर केलेले, वापरण्यात येणारे डिनेचरंट संबंधित अधिकाऱ्यांकडून मोहरबंद करुन प्रमाणित केलेले असावे. डिनेचरंट अधिकृत पत्र संबंधित अधिकाऱ्यांकडून आणावेत. त्याच्यात प्रमाणित डिनेचरंट बाबत विश्लेषण अहवाल असणे आवश्यक आहे.**

३) विपकृत करताना लागणारे पर्यवेक्षण शुल्क यशस्वी लिलावधारकास अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचे कार्यालयात/ कोषागारात भरावे लागेल.

Scanned by CamScanner

४) लिलावात भाग घेण्यापूर्वी अनामत रक्कम म्हणून रुपये २५०००/- रोखीने जमा करावे लागतील बोली स्विकारल्यानंतर अनामत रक्कम लिलावानंतर जागेवरच परत करण्यात येईल.

५) बोली स्विकारल्यास बोलीची रक्कम जागेवरच भरावी लागेल व अथवा चलनाद्वारे शासकीय कोषागारात जमा करुन चलन सादर करावे लागेल.

६) बोली स्विकारल्यानंतर अॅबसोल्युट अल्कोहोलचे मोजमाप करण्यात येईल. त्याला अनुसरुन रक्कम भरावी लागेल. तसेच अनुज्ञप्तीच्या ठिकाणी अॅबसोल्युट अल्कोहोल टाकीमध्ये खाली करताना मोजमाप करण्यात येईल.

७) सदर अॅबसोल्युट अल्कोहोल, मे. स्मृती ऑरगॅनिक्स लि., एमआयडीसी, चिंचोळी, सोलापूर या ठिकाणी पहावयास मिळेल.

८) अॅबसोल्युट अल्कोहोल वाहतूक यशस्वी बोलीधारकांच्या अनुज्ञप्तीपर्यंत पाठविण्याकरिता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचेकडून नियमाप्रमाणे आवश्यक वाहतूक पासपरवाना प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी बोलीधारकांची राहील.

९) लिलावामध्ये खरेदी केलेल्या अॅबसोल्युट अल्कोहोलचा वापर अनुज्ञप्तीवरील मंजूर कोटयामध्ये समायोजीत करण्यात यावा. तसेच साठवणूक क्षमतेचेही उल्लंघन होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकांची राहील.

१०) लिलाव खरेदी केलेले अॅबसोल्युट अल्कोहोल इतर व्यक्तींना विकता येणार नाही.

११) अॅबसोल्युट अल्कोहोल ज्या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे व ते ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत स्विकार करावा लागेल. तसेच त्यांची वाहतूक त्यांच्या अनुज्ञप्तीच्या ठिकाणापर्यंत स्वखर्चाने करावी लागेल.

१२)लिलावात खरेदी केलेले अॅबसोल्युट अल्कोहोल हे मानवी सेवनासाठी /औषध निर्मितीसाठी वापरण्यात येणार नाही.

१३) अॅबसोल्युट अल्कोहोल खरेदी नंतर आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारात भरावे लागेल.

१४) डिनेचर्ड स्पिरीटबाबत असणारे केंद्रीय शुल्क/ जीएसटी/ इतर शुल्क नियमानुसार वेगळे भरावे लागेल.

१५) लिलाव हा लिलाव प्राधिकारी तथा निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ब विभाग सोलापूर यांचे समक्ष होणार असून बोली स्विकारणे अथवा नाकारण्याचे अंतिम अधिकार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांनी राखून ठेवलेले आहेत.

१६) लिलाव बोली स्विकारल्यानंतर सर्व जबाबदारी यशस्वी बोलीधारकांवर राहील.

**मळी लिलावाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे आहेत.**

१) उपरोक्त नमूद केलेली मळी, एम-२ व एम-३ अनुज्ञप्तीधारकांना खरेदी करता येईल.

२) लिलावात भाग घेणाऱ्या व्यक्तीकडे विधीग्राहय अनुज्ञप्तीची प्रत असावी. स्वतः अनुज्ञप्तीधारक लिलाव प्रक्रियेत भाग घेत नसल्यास लिलावास हजर व्यक्तीकडे प्राधिकृत अधिकारपत्र असणे आवश्यक आहे.

३) लिलावात भाग घेण्यापूर्वी अनामत रक्कम म्हणून रुपये ५०००/- रोखीने जमा करावे लागतील बोली स्विकारल्यानंतर अनामत रक्कम लिलावानंतर जागेवरच परत करण्यात येईल.

Scanned by CamScanner

४) बोली स्विकारल्यास बोली रक्कम जागेवरच भरावी लागेल किंवा सदर रक्कम चलनाद्वारे शासकीय कोषागारात जमा करुन चलन या कार्यालयास सादर करावे लागेल.
५) बोली स्विकारल्यानंतर मळीचे मोजमाप करण्यात येईल. त्याला अनुसरुन रक्कम भरावी लागेल. तसेच अनुज्ञप्तीच्या ठिकाणी मळी टाकीमध्ये खाली करताना मोजमाप करण्यात येईल.
६) जप्त मुद्देमाल हा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांच्या कार्यालय परिसरात पहावयास मिळेल.
७) मळी वाहतूक यशस्वी बोलीधारकांच्या अनुज्ञप्तीपर्यंत पाठविण्याकरिता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचेकडून नियमाप्रमाणे आवश्यक वाहतूक पासपरवाना प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी बोलीधारकांची राहील.
८) लिलावामध्ये खरेदी केलेल्या मळीचा वापर अनुज्ञप्तीवरील मंजूर कोटयामध्ये समायोजीत करण्यात यावा. तसेच साठवणूक क्षमतेचेही उल्लंघन होणार नाही हे पाहण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकांची राहील.
९) लिलाव खरेदी केलेली मळी परवानाधारकांशिवाय इतर व्यक्तींना विकता येणार नाही.
१०) जप्त केलेली मळी ज्या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहे व तो मुद्देमाल ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत स्विकार करावा लागेल. तसेच त्यांची वाहतूक त्यांच्या अनुज्ञप्तीच्या ठिकाणापर्यंत स्वखर्चाने करावी लागेल.
११) मळी खरेदी नंतर नियमानुसार आवश्यक ते शुल्क शासकीय कोषागारात भरावे लागेल.
१२) जी.एस.टी. नियमानुसार वेगळा भरावा लागेल.
१३)लिलाव हा लिलाव प्राधिकारी तथा निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ब विभाग सोलापूर यांचे समक्ष होणार असून बोली स्विकारणे अथवा नाकारण्याचे अंतिम अधिकार अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांनी राखून ठेवलेले आहेत.
१४) लिलाव बोली स्विकारल्यानंतर सर्व जबाबदारी यशस्वी बोलीधारकांवर राहील.

| | | |
|---|---|---|
| **१** | **ॲबसोल्यूट अल्कोहोल लिलावाची तारीख** | **दिनांक १५/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता** |
| **२** | **मळी लिलावाची तारीख** | **दिनांक १५/०३/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता** |
| **३** | **लिलावाचे स्थळ** | **अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांचे कार्यालय** |

**मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने.**

(आर.जी. आवळे)
अधीक्षक, रा.उ.शु., सोलापूर
जिल्हाधिकारी, सोलापूर करिता

प्रति,

१. मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२. मा. संचालक (अंमलबजावणी व दक्षता), राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
३. मा. विभागीय, उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, पुणे विभाग, पुणे यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner

४. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,            यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सस्नेह रवाना त्यांना विनंती करण्यात येते की, आपल्या जिल्हयातील यापूर्वी डिएस-५, डिएस-६ धारण करणाऱ्यांना तसेच सद्य:स्थितीत एम-२ व एम-३ अथवा विभागाची विधीग्राहय अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या अनुज्ञप्तीधारक किंवा अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या संस्थेस कळवावे.

५. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ब विभाग सोलापूर यांना आवश्यक कार्यवाहीसाठी. त्यांना सूचित करण्यात येते की, सदर लिलाव प्रक्रियेची कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर कार्यवाहीकामी आपले अधिनस्त निरीक्षक/ दुय्यम निरीक्षक यांचे सहकार्य घेऊन लिलावाची प्रक्रिया पार पाडावी.

Scanned by CamScanner